**दिवाणी दावा नं. १३२/१९८७**

**<u>अर्ज (नि. २८०) वरील आदेश</u>**

१. अर्ज व प्रतिवादी नं. १२ यांनी दिलेले म्हणणे (नि. नं. ३००) चे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (यापुढे संहिता) चे आदेश ६ नियम ७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणेकामी दिलेला आहे.

२. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीतर्फे विधीज्ञ श्री. पी. बी. लाड, प्रतिवादी क्र. १२ तर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. कदम यांचा युक्तिवाद ऐकला. अर्जाचे स्वरुप पाहता विचाराधीन मुद्दे व त्यावरील निश्कर्ष हे त्यापुढे दर्शविल्याप्रमाणे कारणमिमांसेसह नोंदविले आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निश्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित दुरुस्ती मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २ | काय आदेश ? | अंतिम आदेशानुसार |

**<u>कारणमिमांसा</u>**

**मुद्दा क्र. १ बाबत.**

३. वादी तर्फे विधीज्ञ यांनी युक्तीवादादरम्यान सांगितले की, वादी हे या अर्जाने फक्त मिळकत क्षेत्रामध्ये दुरुस्ती करु इच्छीत आहे. वादी यांनी कागद पत्राची यादी नि. नं. ३ सोबत वाद स. नं. १८५ हिस्सा नं. ३ अ/1 चे सातबारा उतारे दाखल केले आहेत. वादी यांनी पुणे येथील मे. वरिष्ठ दिवाणी न्यायालयामध्ये दावा नं. २०६८/२०१४ हा दाखल केलेला आहे व त्यामध्ये वरील स.नं. मधील वादीचे क्षेत्र ० हेक्टर २५ आर म्हणजे पोट खराबा सह ३ एकर ५ गुंठे नमुद केले आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये टंकलेखनामध्ये ० हेक्टर ३५ आर क्षेत्र नमुद झाले आहे. वादीचे निश्चित क्षेत्र हे पुरावा अंतिम निश्चित होईल. दुरुस्ती मंजूर झाल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होत नाही. तसेच प्रतिवादी यांचे हक्कास बाधा येत नाही. पंरतु दुरुस्ती मंजूर न झाल्यास वादीचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे. करीता अर्ज मंजूर करण्याची मागणी केली.

४. प्रतिवादी नं. १२ तर्फे विधीज्ञ यांनी युक्तीवादादरम्यान सांगितले की, वादी यांनी दाखल केलेल्या सातबारा सदरी निश्चित असे वादीचे क्षेत्र नमुद नाही. वादी हा कुळ हक्काने वर नमुद जमीनीमध्ये हक्क सिध्द करु पाहत आहे. प्रस्तावीत दुरुस्तीस साधारण ३५ वर्षे एवढा विलंब

झालेला आहे. प्रस्तावीत दुरुस्तीस कोणत्याही कागदपत्रचा आधार नाही. दुरुस्ती मंजूर झाल्यास प्रतिवादी यांचे हक्कास बाधा येणार आहे. वादीने फक्त निरंतर मनाई हुकुमाची मागणी केलेली आहे. वादी ने मालकी बाबत कथन केलेले नाही. या कारणाने दुरुस्ती मंजूर झाल्यास प्रतिवादींचे जास्त नुकसान होणार आहे.

५. प्रस्तुत दावा हा सन १९८७ मध्ये निरंतर मनाई हुकुमाचे मागणी करीता दाखल झालेला आहे. त्यावेळी वादीने वर नमुद स.नं. चे एकूण क्षेत्र १ हेक्टर २३ आर एवढे दर्शवून त्यापैकी फक्त ० हेक्टर ३५ आर क्षेत्र हे वाद मिळकत म्हणून दर्शवीले आहे. या अर्जाने वादी हे '० हेक्टर ३५ आर ' क्षेत्रा ऐवजी '३ एकर ५ आर ' असे समाविष्ट करु पाहत आहेत. दावा नि.नं. १ चे अवलोकन केले असता, वादीने या अर्जापूर्वी अनेक वेळा दाव्यामध्ये दुरुस्ती केल्याचे दिसून येते. परंतु वाद मिळकतीचे क्षेत्राबाबत दुरुस्ती शक्य तितक्या लवकर केलेली नाही. प्रकरणामध्ये वाद मुद्दे निश्चित होवून वादीने त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. उपरोक्त् विवेचनावरुन नजर चुकीने ० हेक्टर ३५ आर दाव्यामध्ये नमुद झाले हे वादीचे कारण उचित वाटत नाही. याही पुढे वादीने या अनुषंगाने कागदोपत्री पुरावा दिल्यास न्यायाचे हिताचे दृष्टीने व अंतिम न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने याबाबत विचार होवू शकतो. परंतु वादी यांनी प्रस्तावीत दुरुस्तीच्या अनुषंगाने महसूल अभिलेख अथवा इतर कोणताही दस्त अभिलेखावर दिलेला नाही. केवळ वादी यांनी दिवाणी दावा नं. २०६८/२०१४ मध्ये प्रस्तावीत दुरुस्ती प्रमाणे क्षेत्र नमुद केले म्हणून प्रस्तावीत दुरुस्ती मंजूर करणे योग्य नाही. वादी यांनी या अनुषंगाने दिवाणी दावा नं. २०६८/२०१४ मधील नि.नं. १ ची प्रमाणित प्रत नि.नं. २९६ दाखल केलेली आहे. परंतु दुरुस्तीचे स्वरुप पाहता ही बाब वादीस उपयोगी नाही. या विरुध्द प्रतिवादी नं. १२ यांचा दिवाणी दावा नं. १२४/२००० हा या वादी विरुध्द प्रलंबित आहे. या अनुषंगाने प्रतिवादी यांनी कागदपत्राची यादी नि. नं ३०२ व्दारे दावा नं. १२४/२००० मधील नि.नं. १ ची प्रत व त्यास या वादीने दिलेली कैफीयत याची छायांकीत प्रती दाखल केल्या आहेत. याचे अवलोकन केले असता दि. २८/०६/२०१२ रोजी या वादीने वर नमुद दाव्यामध्ये कैफियत नि.नं. ६८ दाखल केली आहे. त्यातील परिच्छेद १३ मध्ये वादीने क्षेत्र ० हेक्टर ३५ आर असे नमुद केले आहे.

६. वादी हे वर नमुद स.नं. मध्ये कुळ हक्काने ताबा कथन करत आहेत. प्रकरणाची सुनावणी सुरु झालेली आहे. प्रस्तावीत दुरुस्ती ही वादीस दावा दाखल करणे पूर्वी पासून ज्ञात होती. परंतु वादीनी सदर दुरुस्ती या पूर्वी शक्य ते लवकर का केली नाही या बाबत स्पष्टीकरण

दिलेले नाही.  या कारणाने प्रस्तुत अर्जास संहिताचे आदेश ६ नियम १७ चे पंरतुक ची बाधा येते.  याही पुढे वादी यांचे प्रस्तावीत दुरुस्तीस कागदोपत्री पुष्टी मिळत नाही. वादीचे दाव्याचे कथन पाहता दुरुस्ती मंजूर झाल्यास दाव्याचे स्वरुपात बदल होत आहे  व प्रतिवादी यांचे हक्कास बाधा येत आहे. उपरोक्त विवेचणावरुन या मुद्दयाचा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे व मुद्दा क्र. २ चे उत्तरांती खालील आदेश पारीत करीता आहे.

**<u>आदेश</u>**

१.  अर्ज (नि. नं. २८०) नामंजूर करण्यात येतो.

२.  खर्चाबाबत आदेश नाही.

भोर

दिनांक – २२/०३/२०२१

(स.का.मुळे)

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोर जि. पुणे